"जुनं ते सोनं" असे म्हणत प्राथमिक विभागातील कला प्रमुख सौ.वंदना चित्रे मॅडम यांच्या गुणांची दखल घेत माध्यमिक विभागातील ज्येष्ठ शिक्षिका सौ.रजनी शेलार मॅडम यांनी सौ.चित्रे मॅडम यांना ५००/- चे पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला.

दि. १६ डिसेंबर २०१७ च्या प्राथमिक विभागाच्या स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून श्री.जितेंद्र राऊत, अध्यक्ष , नुतन विद्या विकास मंडळ व सौ.संध्या सोंडे,लेखिका व नवोपक्रमशील अध्यापिका जि.प.शाळा वडराई ह्या उपस्थित होत्या.

## * सौ. संध्या सोंडे यांनी स्नेहसंमेलन कार्यक्रमा बद्दल दिलेला अभिप्राय *

**वि. वा. चॅरिटेबल ट्रस्ट चे उत्कर्ष विद्यालय (सेमी इंग्रजी माध्यम)**

स्नेहसंमेलन एक हृद्यसंमेलन......

१६डिसेंबर 20१७ रोजी उत्कर्ष विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाला प्रमूख अतिथी म्हणून जाण्याचा योग आला.

खूपच आखीव रेखीव नियोजन, सर्व बाबीकडे स्वतः धावपळ करून लक्ष देणाऱ्या मुख्याध्यापिका सन्माननीय भक्ती वर्तक ,शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे शिक्षकवृंद , भरभरून प्रतिसाद देणारा पालकवर्ग,.....आणि सामाजिक सांस्कृतिक अस्मिता जपणारे चिमुकल्याचे सादरीकरण ,आणि या सर्वांवर कळस म्हणजे वृषाली पाटील मॅडम आणि त्यांच्या टीम ने केलेले बहारदार सूत्रसंचालन

सन्माननीय जितेंद्र राऊत ,कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या सन्माननीय कल्पना राऊत यांच्या बरोबर व्यासपीठावर बसण्याचे भाग्य मला मिळाले.

हृदय संमेलन या साठी की या सर्व कार्यक्रमात मुख्याध्यापिका ,शिक्षक वर्ग ,पालकवर्ग परस्परांवर अक्षरशः प्रेमाचा आपुलकी चा वर्षाव करत होते.

एवढा भव्य कार्यक्रम यशस्वी करताना कोठेही त्रागा , विस्कळीत पणा नव्हताच.

मला दिलेले प्रेम सन्मान निव्वळ अविस्मरणीय , व्यासपीठावर वाद्यांच्या गजरात माझी भरलेली ओटी .....म्हणजे सांस्कृतिक वारसा जपून माझा केलेला सन्मान खूपच अप्रतिम ... .

भविष्यात ही असेच हृद्य सामाजिक सांस्कृतिक वारसा जपणारे कार्यक्रमाचे आयोजन आपल्याकडून होऊ दे

आभाळभर शुभेच्छा..

मनःपूर्वक धन्यवाद

**सौ. संध्या सोंडे**